



परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.

https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे





बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 115 | गुरुवार दि. 21 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# शरद पवारांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे तोंडभरून कौतुक





शरद पवार हे केवळ राज्याच्या नव्हे तर देशाच्या राजकारणातील एक मोठं नाव आहे. शरद पवार यांनी आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वाची पदे भुषविलेली आहेत. देशातील अनेक नेते त्यांना आपले आदर्श मानतात. अनेक विरोधी नेतेही त्यांचे कौतुक करतात. मात्र आज मुंबईतील माजी प्रदेश व जिल्हा पदाधिकारी यांच्या स्नेहमेळाव्यात बोलताना शरद पवार यांनी देशांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. त्यांनी नेमकं काय म्हटले ते सविस्तर जाणून घेऊयात.मुंबईतील कार्यक्रमात बोलताना शरद पवार यांनी म्हटले की, मी संयोजकांचे धन्यवाद मानतो. आज हा कार्यक्रम आयोजित केला. तुमच्या उमेदीच्या काळात तुम्ही राष्ट्रवादी युवक काँग्रेसमध्ये काम केलं. मी वयाच्या अठराव्या वर्षी मी पुण्यात युवक काँग्रेसमध� सहभागी झालो होतो. आम्ही काम करत असताना इंदिरा गांधी युवक काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष होत्या. इंदिरा गांधी नंतर पंतप्रधान झाल्या, त्यांचा रशिया दौरा झाला. त्यांच स्वागत करण्यात आले नाही, त्यावेळी इंदिरा गांधी लहान मुलांबरोबर खेळायला लागल्या. रशियाचे राष्ट्रपती यांच्या लक्षात आले की आपण स्वागत केले नाही. चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी माफी मागितली होती.'पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, 'सुरुवातीला बारामती युवक काँग्रेसचा प्रमुख झालो. 4 वर्षांनी महाराष्ट्राचा प्रमुख झालो. आम्ही विनंती केली, आम्हाला पंडित नेहरूंना भेटायचे आहे, शेतकऱ्यांचे आणि इतर प्रश्न नेहरू यांच्या समोर मांडण्याचे ठरले. पंडित नेहरू समोर आले आणि आम्ही काय बोलायचे ते विसरलो. त्यानंतर इंदिरा गांधींसोबत काम करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य आहे.'शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक करताना म्हटले की. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान आहेत, त्यांची आणि आमची वैचारिक भूमिका वेगळी असू शकते. पण आज देशाच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा पान 3 वर

# मोदी-फडणवीस चोरीचा माल आहेत", काँग्रेस नेत्याचं वादग्रस्त विधान



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सध्या पाच देशांच्या दौऱ्यावर आहेत. यांपैकी मोदी सध्या तिसऱ्या देशात म्हणजेच इटलीत आहेत. याठिकाणी त्यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यासोबत द्वीपक्षीय चर्चा केली. त्यानंतर दोघांमधील काही हलक्या फुलक्या क्षणांचे फोटोज सोशल मीडियावर व्हायरल झाले. एका व्हिडिओत तर मोदींनी मेलोनींना भारतातील पारलेचं मेलोडी हे प्रसिद्ध चॉकलेट गिफ्ट दिलं. यावरुन मोदींना मोठ्या ट्रोलिंगला समोरं जावं लागलं आहे. त्याच्यावर विरोधीपक्ष नेते राहुल गांधी यांनीही सडकून टीका केली. त्यानंतर मुख्यमंत्री फडणवीसांनी राहुल गांधीवर पलटवार केला. यावरुन आता काँग्रेसचे इतर नेते आक्रमक झाले असून महाराष्ट्राचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मोदी-फडणवीसांना थेट चोरीचा माल असं संबोधलं आहे. त्यांच्या याविधानामुळं वाद होण्याची शक्यता आहे.नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीस हे चोरीचा व डकेतीचा माल आहेत. ईव्हीएम मॅनेज करणे, बोगस मतदार याद्या, एसआयआर सारख्या वेगवेगळ्या मार्गांने जनतेचा मतदानाचा अधिकार डावलून केंद्र आणि राज्यातील सरकारी यंत्रणांचा वापर करून लोकशाहीचा खून भाजपने केला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशाची आर्थिक स्थिती, विदेश नीती, बेरोजगारी, पेपरफुटी आणि महागाई या मुद्द्यांवर उपाययोजना करण्यात आलेलं अपयश आणि जनतेला काटकसर करण्याचा उपदेश देत पान 3 वर


# आज ठळक

## ' विदर्भात उष्णतेचा हाहाकार! चंद्रपूर 46.2, अमरावती 46.4 तर, वर्ध्यात 47.1 सेल्सिअस तापमानाची नोंद




राज्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला असून विशेषतः विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये सूर्य कोपल्याचे चित्र आहे. विदर्भात तापमानाचा पारा कमालीचा वाढला असून वर्धा येथे तब्बल 47.1 अंश सेल्सिअस एवढ्या विक्रमी तापमानाची नोंद झाली आहे. त्याखालोखाल अमरावती (46.4 सेल्सिअस) आणि चंद्रपूर (46.2 सेल्सिअस) या जिल्ह्यांमध्येही उष्णतेची तीव्र लाट पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने नागरिकांना कडक उन्हापासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी खबरदारीचा इशारा दिला आहे.विदर्भात उष्णतेचा कहर दिवसेंदिवस वाढत असून तीव्र उन्हामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात सातत्याने वाढ होत असल्याने संपूर्ण परिसर अक्षरशः भाजून निघत आहे. वाढत्या उष्णतेच्या लाटेने धोकादायक पातळी गाठल्याने नागपूर प्रादेशिक हवामान केंद्राने 21 मेपर्यंत पुढील चार दिवस संपूर्ण विदर्भातील नागरिकांना विशेष सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.प्रशासनाचा नागरिकांना महत्त्वाचा आवाहन विदर्भातील ही भीषण परिस्थिती पाहता प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्यासाठी सतर्कतेचा इशारा दिला आहे. उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी दुपारी 12 ते 4 या वेळेत अत्यंत महत्त्वाचे काम असल्याशिवाय नागरिकांनी घराबाहेर पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच भरपूर पाणी पिणे, सुती कपडे वापरणे आणि डोके व पान 3 वर

## नितीन गडकरींकडून राहूल गांधींच्या त्या वक्तव्याचा निषेध



नागपूर: पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या इटली दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यात द्विपक्षीय चर्चा होणार असून काही महत्वाचे निर्णय होण्याची शक्यता आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्यावरून विरोधकांनी जोरदार टीकेची झोड उठवली आहे. या टीकेचे कारण म्हणजे पंतप्रधान मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना मेलडी चॉकलेट्सचा पुडा गिफ्ट दिला आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे. यात हे नेतृत्व नाही, तर नौटंकी आहे", अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे. यावरून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राहूल गांधी यांचा समाचार घेतला आहे. त्यांच्या या टीकेतून गोंधळलेली मानसिकता दिसते असाही आरोप केला.विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट शेअर केली आहे. त्या पोस्टमध्ये राहुल गांधी म्हणाले की, "देश आर्थिक संकटात आहे आणि आपले पंतप्रधान इटलीमध्ये चॉकलेट्स वाटत आहेत. एकीकडे शेतकरी, तरुण, महिला, मजूर आणि छोटे व्यावसायिक आक्रोश करत आहेत. मात्र, दुसरीकडे पंतप्रधान मोदी हे हासत आहेत आणि रिल्स बनवत आहेत, त्यावर भाजपा टाळ्या वाजवत आहे. हे नेतृत्व नाही, तर नौटंकी पान 3

# ना. पंकजाताई मुंडे यांची 'ईव्ही' मधून मंत्रालयात एंट्री ; पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद



मुंबई।दिनांक 20।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास केला. इंधन बचतीचा संदेश देत त्यांनी इलेक्ट्रिक वाहनाचा वापर करण्याचे आवाहन केले आहे.

सध्याची जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी पेट्रोल, डिझेलचा वापर कमी करून इंधन बचतीचे आवाहन केले होते, त्यांच्या आवाहनाला सर्वत्र चांगला प्रतिसाद मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सर्व मंत्री कार्यालय व विभागांना इंधन बचतीचे आवाहन केले आहे. या आवाहनाला प्रतिसाद देत पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज रामटेक निवासस्थान ते मंत्रालय पर्यंतचा प्रवास 'ईव्ही' कारने केला. तसं पाहिलं तर पर्यावरण मंत्री या नात्याने ना. पंकजाताई ह्या सुरवातीपासूनच ईव्ही वाहन वापरत होत्या, निवासस्थान ते मंत्रालय, विधानभवन असा प्रवास त्या याच ईव्ही मधून करतात. पंतप्रधानांच्या आवाहनानुसार याच वाहनातून प्रवास करत त्यांनी इंधन बचतीबरोबरच प्रदुषण पान 3 वर

# श्रीलंकेत उभारणार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन

## भारत-श्रीलंकेतील भंतेदरम्यान करार



नागपूर : भारत आणि श्रीलंका यांच्यातील बौद्ध धम्माच्या संशोधन आणि अध्यापन सहकार्याला नवे बळ देणारा महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत श्रीलंकेची राजधानी असलेल्या कोलंबोमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्यात येणार आहे. पान 3 वर

# नीट'च्या घोटाळेबाज प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णींचे बांधकाम 'वाकडे'



बीड : 'नीट' पेपरफुटी प्रकरणात सीबीआयच्या जाळ्यात अडकलेला आणि लातूरमध्ये कार्यरत असलेला बीडचा प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी याचे शाहूनगर भागात महालक्ष्मी मंदिराजवळ सुरु असलेले अवाढव्य बांधकाम पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे मंगळवारी उघड झाले. बीड नगरपालिकेच्या पथकाने सायंकाळी 5 वाजता प्रत्यक्ष स्थळी जाऊन केलेल्या पान 3 वर

# परळीतील गर्भातील बाळाचा मृत्यू व हेळसांड : अद्याप आहवालही नाही अन् कारवाईही नाही- कुटुंबाची न्यायासाठीही हेळसांड!

**●पैसे उकळण्यासाठीच संबंधित डॉक्टरांनी मृत गर्भ 22 तास पोटात ठेवला – कुटुंबीयांचा गंभीर आरोप**



परळी वैजनाथ (प्रतिनिधी):

परळी शहरातील गित्ते हॉस्पिटल या रुग्णालयात उपचारा दरम्यान गर्भातील बाळाचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून, संबंधित डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच ही घटना घडल्याचा आरोप पीडित कुटुंबीयांनी केला आहे. तसेच बाळाचा मृत्यू झाल्यानंतरही तब्बल 22 तास मृत गर्भ महिलेच्या पोटात ठेवून पैशांची उकळपट्टी करण्यात आल्याचा गंभीर आरोप तक्रारदार वैजनाथ मुंडे यांनी केला आहे. दरम्यान चौकशीचा सोपस्कार पार पडला मात्र अद्याप आहवाल नाही, कोणतीही कारवाईही नाही. त्यामुळे कुटुंबाची न्यायासाठीही हेळसांड होत आहे.

सौ.दीप्ती वैजनाथ मुंडे यांच्यावर गर्भधारणेपासून संपूर्ण उपचार परळी येथील गित्ते हॉस्पिटलमध्ये डॉ. कल्पना सचिन गित्ते यांच्या देखरेखीखाली सुरु होते. उपचारादरम्यान डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे गर्भातील बाळाचा मृत्यू झाला.तसेच बाळमातेच्या जीवाशी खेळण्यात आले पान 3 वर

# हनुमान व्यायाम शिबिरात मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



परळी वैजनाथ येथे हनुमान व्यायाम शाळा अंतर्गत आयोजित हनुमान व्यायाम शिबिर तथा संस्कार वर्गामध्ये विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर बुधवार दि. 20 मे 2026 रोजी उत्साहात संपन्न झाले.

या शिबिरामध्ये प्रसिद्ध पान 3 वर

# नांदुरघाट येथे पोलिसांची कारवाई : अवैधरित्या गोवंशीय प्राण्यांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला



केज: बेकायदेशीर व निर्दयी पद्धतीने विनापरवाना गोवंशीय प्राण्यांची वाहतूक करणाऱ्या टेम्पोवर नांदुरघाट पोलिसांनी कारवाई करत वाहनासह सात गोवंशीय प्राणी जप्त केले आहेत. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्पोर्ट्स न्यूज

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदुरघाट दुरक्षेत्र पोलिस चौकीचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब सानप यांना मंगळवार, दि. 20 मे रोजी रात्री सुमारे 9 वाजण्याच्या सुमारास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, अशोक पान 3 वर

# संस्कार'च्या शिलेदारांची इयत्ता 5 वी स्कॉलरशिप परीक्षेत गरुडझेप!

## संस्कार प्राथमिक शाळेचे तब्बल 54 विद्यार्थी पात्र; गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम




परळी (प्रतिनिधी)- दि. 22 फेब्रुवारी 2026 रोजी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवीच्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (स्कॉलरशिप) परीक्षेत 'संस्कार प्राथमिक शाळेने (पद्मावती विभाग व विद्यानगर विभाग) घवघवीत यश संपादन करून गुणवत्तेची आपली दैदिप्यमान परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या परीक्षेत शाळेचे तब्बल 54 विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले असून,विद्यार्थ्यांनी आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या आणि कठोर परिश्रमाच्या बळावर संस्कार शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या अत्यंत चुरशीच्या परीक्षेत शाळेतील विद्यार्थ्यांनी मिळवलेले गुण त्यांच्या कठोर परिश्रमाची साक्ष देतात. एकूण तीनशे गुणांच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे आणि त्यांचे प्राप्त गुण खालीलप्रमाणे आहेत:

1-आरोही राहुल सोळंके -268
2-हिंदवी वैजनाथ सोळंके -268
3-सार्थक महादेव शिंदे- 268
4-सिद्धी राम मुंडे -268
5-आरोही योगेश नानवटे -268
6-आरुषी शैलेश पांडकर -264
7 -समृद्धी भानुदास सावंत -266
8-सिद्धी संजय धुमाळ -266
9-सोहम मारोती हाडबे -266
10-आरव नितीन चौंडे -262
11-गौरव धनराज आघाव -260
12-पीयूष पांडुरंग पांचाळ -260
13 -प्रज्ञा विनोद घनघाव- 258
14-तनिष्का रवींद्र डोंगरे- 258
15 -नम्रता नवनाथ माळवे -256
16 -समृद्धी जीवन मुंडे -256
17-सुदर्शन चंद्रकांत चाटे -256
18-ईश्वरी समाधान भाजीभाकरे -252

पान 3 वर

# नीट पेपर लिक म्हणजे शिक्षण प्रणालीची खुली हत्याच;

देशात शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचार म्हणजे युवा पिढीच्या आयुष्यावर घणाघाती प्रहार होय.देशात अनपेक्षित देशद्रोहाचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.काही देशद्रोही लोकांनी नीट पेपर लिक करून 25 लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळुन खुली हत्या केली आहे व शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराला कंटाळून 4 विद्यार्थांनी आत्महत्या सुध्दा केल्याचे सांगितले जाते.परंतु अजुनपर्यंत शिक्षण क्षेत्रातील कायदे कठोर करण्यात आलेले नाही ही आपली शोकांतिका म्हणावी लागेल. नीट पेपर ज्यामधुन डॉक्टर्स निर्माण होतात म्हणजे एक दैवी शक्तीचा उगम होतो अशा गंभीर परीक्षेचे पेपर लिक होणे म्हणजे शैक्षणिक क्षेत्राची खुली हत्याच म्हणावी लागेल. कारण नीट पेपरच्या संबंधित विभागाने पेपर लिक करून विद्यार्थ्यांच्या आयुष्या सोबत घाणेरडा खेळ खेळला आहे. त्याचप्रमाणे पेपर लिक प्रकरणातील दोषींनी विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खुला खिलवाळ केला त्यामुळे या प्रकरणातील संपूर्ण दोषींना "सजा-ए-मौत" व्हायला पाहिजे तेव्हाच शिक्षण क्षेत्रात सुधारणा संभव आहे.कारण शिक्षण क्षेत्रातील किंवा पेपर लिक प्रकरणातील संपूर्ण कारणामे राजकीय आश्रयाशिवाय होऊच शकत नाही.त्यामुळे या प्रकरणातील मुख्य मासे अजुनपर्यंत समोर आलेलेच नाही.कारण पेपर लिक करणारा आणि घेणारा हा गडगंज संपत्तीवाला व्यक्ती असतो आणि पेपर लिक करणाऱ्यांचे जाळे सुद्धा अफाट असते ही बाब आता उघडकीस येत असलेल्या प्रकरणावरून लक्षात येते.कारण हा पेपर जेथुन तयार झाला तेथुनच फुटला आहे म्हणजे खरा देशद्रोही आपल्याच घरात आहे (घर का भेदी लंका ढाए)त्यामुळे 25 लाख मुलांच्या भविष्याशी खेळणाऱ्यां संपूर्ण आरोपींना फाशीची शिक्षा अत्यंत आवश्यक आहे.कारण पेपर लिक प्रकरणातील आरोपींनी विद्यार्थ्यांचे उभे आयुष्य बर्बाद करून शिक्षण प्रणालीची खुली हत्या करून कलंकित केले आहे.त्यामुळे या प्रकरणातील दोषींना फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून फासावर लटकविले पाहिजे. बलात्कारी हा देशाच्या सभ्यतेचा हत्यारा आहे व भ्रष्टाचारी हा 140 कोटी जनतेचे रक्त पिऊन जनतेला मृत्यूच्या खाईत लोटत आहे.त्याचप्रमाणे नीट प्रकरणातील दोषी देशाचे भविष्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांचा हत्यारा आहे त्यामुळे या तिन्ही प्रकरणातील दोषींवर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून निकाल लावून ताबडतोब फाशीची शिक्षा सुनावली तरच यात सुधारणा होऊ शकते.अन्यथा "तुका म्हणे उगे रहा जे जे होईल ते ते पहा " ही म्हण सरकारला लागू होऊ शकते. पुणे क्षेत्राचे नाव शिक्षण क्षेत्रात भारतभर प्रसिद्ध आहे.परंतु येथुन संपूर्ण देशात जहर घोळण्याचे काम पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे,प्रा.पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून महाराष्ट्राला देशात बदनाम केले आहे आणि आता पुन्हा सीबीआय ने लातूर मधील "बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचा"अर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकरला अटक करण्यात आली आहे.यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ- मोठे मासे आपल्या महाराष्ट्रात घर करून आहे व शिक्षण प्रणालीला पोखरत आहे.नीट पेपर लिक प्रकरण हे येणाऱ्या भविष्यावर काळा धब्बा आहे.त्यामुळे देशभरात नीट पेपर लिक प्रकरणामुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. सरकारला शिक्षण प्रणाली मजबूत करायची असेल आणि शिक्षण क्षेत्रातील माफियाराजचा सफाया करायचा असेल तर या प्रकरणातील गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हायलाच पाहिजे अन्यथा शिक्षण क्षेत्रातील हा गोरखधंदा असाच सुरु राहिल यात तिळमात्र शंका नाही.कारण गुन्हेगारांना अनेक पळवाटा आहेत त्यातुन ते मार्ग काढून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरु ठेवून पळवाट काढतील.परंतू पेपर लिक प्रकरण हा देशाच्या 140 कोटी जनतेवर व शिक्षणाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर घणाघाती प्रहार आहे.यांना सरकारने वेळीच रोखले नाही तर अनर्थ होऊ शकतो. सरकार विद्यार्थांना खरोखरच न्याय देण्यास सक्षम असेल तर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून पेपर लिक प्रकरणातील निकाल लावून फासावर लटकविले पाहिजे.कारण पेपर लिक प्रकरणातील गुन्हेगारांनी आरोग्य व डॉक्टर या शब्दाला कलंकीत केले आहेत.त्यामुळे त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची दयामाया नकोच.देशात जेव्हापासून खाजगी कोचिंग क्लासेस व खासगी शाळा-महाविद्यालये अस्तित्वात आली तेव्हा पासून संपूर्ण शिक्षण प्रणाली कलंकित झाल्याचे दिसून येते ही बाब नीट पेपर लिक प्रकरणावरून लक्षात येते.आज खाजगी कोचिंग क्लासेसमुळे व खासगी शाळा-महाविद्यालयामुळे देशातील अनेक पालक वर्ग आपल्या मुलांना सरकारी शाळा- महाविद्यालये पाठविण्यास तयार नाहीत त्यामुळे आज देशातील अनेक सरकारी शाळा-महाविद्यालये बंजार असल्याचे दिसून येते किंवा बंद पडलेल्या अवस्थेत आहेत किंवा धुळ खात आहेत.त्यामुळे शिक्षण क्षेत्रात सरकारला खरोखरच सुधारणा करायची असेल व पेपर लिक प्रकरण टाळायचे असेल तर सर्वप्रथम सरकारी शाळा-महाविद्यालये सुधारून; खाजगी कोचिंग क्लासेस व खासगी शाळा-महाविद्यालयावर अंकुश लावावा लागेल तेव्हाच शिक्षण क्षेत्रात सुधारणा संभव होवू शकते.कारण खाजगी कोचिंग क्लासेस हे शिक्षणाचे क्षेत्र कमी व व्यवसायाचे क्षेत्र जास्त बनल्याचे दिसून येते.जय हिंद!



लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.9921690779, नागपूर.

# पंतप्रधान नरेंद्रजी मोदी भारताच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा जपतात, भारतात काय? : विवेक विचार

**डॉ. भारत कऱ्हाड**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने गेल्या काही वर्षांत जागतिक स्तरावर एक वेगळी आणि प्रभावी ओळख निर्माण केली आहे, हे नाकारता येणार नाही. आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये भारताची वाढती उपस्थिती, अमेरिका, फ्रान्स, जपान, इस्त्रायल, युएई यांसारख्या देशांबरोबरचे दृढ संबंध, जी 20 सारख्या महत्त्वाच्या परिषदांचे यशस्वी आयोजन आणि "वसुधैव कुटुंबकम्" सारख्या भारतीय विचारसरणीचा जागतिक प्रचार यामुळे भारताची प्रतिमा उंचावल्याचे अनेक अभ्यासक मानतात. परंतु दुसरीकडे देशातील सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही प्रश्नांवरुन सरकारवर सातत्याने टीका देखील होत आहे. त्यामुळे "पंतप्रधान नरेंद्र मोदीजी भारताच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा जपतात, देशात नाही" हे विधान अनेकदा चर्चेत येते. हे विधान पूर्णतः योग्य किंवा पूर्णतः चुकीचे असे एका ओळीत सांगणे कठीण आहे, कारण भारताचे वास्तव बहुपेडी आहे आणि नेतृत्वाचे मूल्यमापन करताना विविध अंगांनी विचार करावा लागतो.

मोदी सरकारने परराष्ट्र धोरणात अत्यंत सक्रिय भूमिका घेतली. "नेबरहूड फर्स्ट", "ॲक्ट ईस्ट", "डिजिटल इंडिया", "मेक इन इंडिया", "स्टार्टअप इंडिया" यांसारख्या उपक्रमांद्वारे भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत अधिक प्रभावी स्थान मिळवून देण्याचा प्रयत्न झाला. जी 20 परिषदेदरम्यान भारताने आफ्रिकन युनियनला सदस्यत्व मिळवून देण्यात पुढाकार घेतला. कोविड काळात "व्हॅक्सीन मैत्री" अभियानाद्वारे अनेक देशांना लस पुरवण्यात आली. या सर्व घटनांमुळे भारताची प्रतिमा "जागतिक जबाबदार शक्ती" अशी तयार झाली.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी भारताला "उदयास येणारी जागतिक शक्ती" म्हटले होते. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मायक्रोन यांनी भारताला जागतिक स्थैर्याचा विश्वासाई भागीदार म्हटले आहे. परराष्ट्रमंत्री एस जय शंकरजी यांनी अनेकदा असे सांगितले आहे की भारत आता फक्त प्रादेशिक मर्यादांमध्ये अडकून राहिलेला देश नसून जागतिक धोरणांवर प्रभाव टाकणारा राष्ट्र म्हणून उदयास येत आहे. त्यांच्या मते भारताचे परराष्ट्र धोरण आता अधिक आत्मविश्वासपूर्ण आणि स्वतंत्र झाले आहे.

मोदी यांच्या समर्थकांचे म्हणणे असे आहे की अनेक दशकांनंतर भारताला जागतिक स्तरावर ठाम भूमिका घेणारे नेतृत्व मिळाले. पूर्वी भारत अनेकदा जागतिक घडामोडींमध्ये सावध आणि संकोचपूर्ण भूमिका घेत असे, परंतु आता भारत स्वतःचे राष्ट्रीय हित उघडपणे मांडतो. क्वाडसारख्या गटांमध्ये भारताची सक्रिय भूमिका, रशिया-युक्रेन युद्धात संतुलित भूमिका, चीनविरोधात सीमावादाच्या संदर्भात घेतलेली कठोर भूमिका यामुळे भारताची ताकद वाढल्याचे समर्थक मानतात. अनेक परदेशी गुंतवणूकदारांनी भारताकडे आशेने पाहण्यास सुरुवात केली. डिजिटल व्यवहार, स्टार्टअप संस्कृती आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात झालेली वाढही या प्रतिमेला बळ देणारी ठरली.

परंतु या चमकदार जागतिक प्रतिमेच्या पाठीमागे देशातील वास्तव वेगळे असल्याची टीका विरोधकांकडून केली जाते. बेरोजगारी, महागाई, शेतकरी आंदोलन, सामाजिक ध्रुवीकरण, धार्मिक तणाव, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेतील समस्या या प्रश्नांवरुन सरकारवर अनेकदा आरोप झाले. विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांनी संसदेत आणि सभांमध्ये वारंवार असा आरोप केला की सरकार सामान्य नागरिकांच्या समस्यांपेक्षा प्रतिमा व्यवस्थापनावर अधिक भर देते. त्यांच्या मते देशातील युवकांना रोजगार, शेतकऱ्यांना हमीभाव आणि मध्यमवर्गाला आर्थिक स्थैर्य मिळणे अधिक महत्त्वाचे आहे.

अर्थतज्ज्ञ अमर्त्य सेन यांनी अनेक मुलाखतींमध्ये विकासाचा अर्थ केवळ जीडीपी वाढ नसून शिक्षण, आरोग्य, सामाजिक समानता आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य देखील महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते एखादा देश जागतिक स्तरावर मोठा दिसत असला तरी त्या देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाली नाही तर तो विकास अपुरा राहतो. काही सामाजिक अभ्यासकांच्या मते भारतात लोकशाही संस्थांच्या स्वायत्ततेबद्दल चिंता निर्माण झाली आहे. माध्यमांवरील दबाव, विरोधकांवर होणाऱ्या कारवाया, समाजातील वाढता ध्रुवीकरणाचा कल यामुळे देशांतर्गत वातावरण तणावपूर्ण होत असल्याची टीका केली जाते.

मोदीजी यांच्या नेतृत्वशैलीत "इमेज बिल्डिंग" हा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. मोठ्या प्रमाणावर कार्यक्रमांचे आयोजन, सोशल मीडियाचा प्रभावी वापर, परदेशातील भारतीय समुदायांशी संवाद, सांस्कृतिक प्रतीकांचा वापर आणि थेट जनतेशी संवाद या माध्यमातून एक प्रभावी नेतृत्वाची प्रतिमा उभी करण्यात आली. समर्थकांच्या मते हे आधुनिक काळातील प्रभावी राजकारण आहे. आजच्या डिजिटल युगात जागतिक प्रतिमा निर्माण करणे ही देखील राष्ट्रहिताची गरज आहे. परंतु टीकाकारांचे म्हणणे असे आहे की प्रतिमेपेक्षा वास्तव अधिक महत्त्वाचे असते. जर देशातील युवक बेरोजगार असतील, शेतकरी अस्वस्थ असतील, सामाजिक सलोखा धोक्यात असेल तर आंतरराष्ट्रीय गौरवाचा सामान्य नागरिकाला मर्यादित लाभ होतो.

लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही नेतृत्वाचे मूल्यमापन फक्त एका बाजूने होऊ शकत नाही. एखादा नेता जागतिक स्तरावर यशस्वी असू शकतो, पण देशांतर्गत प्रश्नांवर अपयशी ठरु शकतो किंवा उलटही असू शकते. त्यामुळे संतुलित दृष्टीकोन आवश्यक असतो. अटल बिहारी वाजपेयीजी यांनी एकदा म्हटले होते, "सरकारें आएंगी जाएंगी, पार्टियां बनेंगी बिगड़ेंगी, लेकिन यह देश रहना चाहिए." या विधानात लोकशाहीचे सार दडलेले आहे. राष्ट्र हे कोणत्याही व्यक्ती किंवा पक्षापेक्षा मोठे असते. त्यामुळे सरकारचे चांगले काम मान्य करणे जितके आवश्यक आहे तितकेच त्रुटींवर प्रश्न विचारणेही आवश्यक असते.

आज भारत एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. जग भारताकडे आर्थिक, सामरिक आणि सांस्कृतिक शक्ती म्हणून पाहत आहे. परंतु त्याच वेळी देशातील सामाजिक समता, रोजगारनिर्मिती, शिक्षण, आरोग्य आणि लोकशाही मूल्ये टिकवणे हे देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक प्रतिष्ठा आणि देशांतर्गत कल्याण यांचा समतोल राखणे ही कोणत्याही नेतृत्वासाठी सर्वात मोठी कसोटी असते. मोदीजी यांच्या नेतृत्वाने भारताला जागतिक ओळख दिली, हे अनेकांना मान्य आहे; परंतु त्या बरोबरच देशातील प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक आणि सुरक्षित बदल घडवणे ही अपेक्षा अजूनही कायम आहे.

"मोदीजी भारताच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा जपतात, देशात नाही" हे विधान केवळ राजकीय टीका म्हणून पाहण्यापेक्षा ते देशातील नागरिकांच्या अपेक्षा आणि अस्वस्थता यांचे प्रतीक म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल. कारण भारताची खरी ताकद केवळ परदेशातील टाळ्यांमध्ये नसून देशातील सामान्य माणसाच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या समाधानात असते.

**डॉ. भारत कऱ्हाड, आर्थिक आणि राजकीय विश्लेषक, पुणे.**

# दहशत व हिंसा यांमुळे मानवी जीवन प्रभावित

## (21-27 मे: जागतिक दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस विशेष)

_दहशतवादाची शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता व शांतता भंग पावते. आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न श्री एन. के. कुमार, से.नि.अध्यापक हे सदर लेखातून करत आहेत... संपादक._

दहशतवादाचा फटका जगातील अनेक देशांना बसत आहे. त्यामुळे हा प्रश्न कोणत्याही एका देशाचा नाही. दहशतवाद जगात सर्वत्र वेगाने पसरत आहे. त्यामुळे जागतिक शांततेला धोका निर्माण झाला आहे. मे 1991मध्ये काँग्रेस पक्षाच्या प्रचारादरम्यान तामिळनाडू राज्यातील श्रीपेरंबुदुर येथे सभेला संबोधित करत असताना दहशतवाद्यांनी भारताचे दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या घडवून आणली. या घटनेचे औचित्य साधून 21 मे हा दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळला जातो. याच दिवशी त्यांची पुण्यतिथी असते. हाच दिवस दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून संपूर्ण देशात व जगातही पाळला जातो. या देशाचे सर्वात तरुण पंतप्रधान म्हणून त्यांनी सन 1984 ते सन 1989पर्यंत काम पाहिले. संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित व्हावी व अहिंसेचा संदेश सर्वत्र पोहोचावा तसेच देशासाठी दहशतवाद विरोधात लढणाऱ्या हजारो सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करणे, भावी पिढीला मूलगामी प्रभावापासून वाचविणे, त्यांच्या मनामध्ये देशाच्या प्रगतीसाठी, संरक्षणासाठी जागरुकता निर्माण करणे, हे देखील या दिवसाचे उद्देश आहेत. या मानवनिर्मित उपद्रवी कृत्यांची जॉन क्रेटम यांनी अशी व्याख्या केली- आपल्या राजकीय मागण्या जबरदस्तीने मान्य करून घेण्यासाठी विशिष्ट समूहात आत्यंतिक भीती निर्माण करण्याच्या हेतूने एखादी व्यक्ती किंवा गट यांनी प्रस्थापित सत्तेच्या बाजूने किंवा विरोधात चालविलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय.

आज सर्व जगच दहशतीच्या छायेखाली सापडलेले असून कोणत्या ठिकाणी कधी हल्ला होईल? याची सततची टांगती तलवार प्रत्येकाच्या डोक्यावर लटकत असते. कोणता मनुष्य आज सुरक्षित आहे, हे खात्रीपूर्वक सांगणे कठीण झालेले आहे. मुंबई, दिल्लीसारख्या मोठ्या शहरातील माणूस सकाळी घराबाहेर पडला, तर संध्याकाळी तो सुखरूप घरी परतेल का? याची खात्री देता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. भारतातील दहशतवादाचा विचार केला, तर अनेक वेळा दहशतवादी हल्ले झालेले आहेत. मग तो मुंबई लोकल ट्रेनमधील साखळी बॉम्ब हल्ला असेल, सीएसटी.रेल्वेस्टेशनवर तसेच हॉटेल ताज, हॉटेल ओबेरॉय येथील हल्ला असेल. या देशाचा मानबिंदू म्हणून ज्याकडे आदराने पाहिले जाते; त्या पवित्र संसदेवर देखील अतिरेक्यांनी हल्ला केला. तसेच उरी वा पुलवामा येथे सीआरपीएफ जवानांच्या गाड्यांच्या ताफ्यावर झालेला हल्ला असेल, असे वर्षानुवर्षे दहशतवादी प्रवृत्ती हल्ले करत आहे. जम्मू-काश्मीर येथे नियमित असे हल्ले होत आहेत. त्यामुळे हजारो निरपराध नागरिक, कर्तव्यावरील भारतीय सैनिक पोलीस दल यांना आपले प्राण गमवावे लागले आहेत.

विशेषतः दहशतवादाचे स्वरुप असे असू शकते- संघटित, नियोजित व हिंसात्मक कृती करणे, राजकीय हेतूने प्रेरित होणे, बळजबरी व धमक्या देण्यासाठी शस्त्रांचा वापर करणे, लक्ष्य हे निवडक आणि निश्चित असणे, लोकशाही विरोधी कृत्य घडविणे, मानवीहक्कांचा भंग करणे. याच गोष्टी स्थानिक ते वैश्विक स्वरूप धारण करु शकतात. यास कारणीभूत काही ढोबळ कारणे अशी: 1) आंतरराष्ट्रीय कारणे- राजनैतिक मार्गाने उद्दिष्टे साध्य होत नाहीत म्हणून शत्रू राष्ट्रावर मात करण्यासाठी दहशतवाद अंगीकारला जातो. मूलतत्त्ववादी व धार्मिक कट्टरवादी हे दहशत निर्माण करून आपल्या उद्दिष्टांचा व धार्मिक तत्त्वांचा अंगीकार करु इच्छितात. छोट्या राष्ट्रांना बड्या राष्ट्रांबरोबर युद्ध करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्याने दहशतवादाचा मार्ग त्यांना फायदेशीर वाटतो. लष्करी सामर्थ्य वाढविण्यापेक्षा दहशतवादास पाठिंबा देणे सोपे असते. उदाहरणार्थ- पाकिस्तानचा काश्मीरमध्ये चालू असलेला सरकार पुरस्कृत दहशतवाद. वाढते नागरिकीकरण व शहरीकरण यामुळे होणारा त्रास. 2) सामाजिक कारणे- बेकारी, सामाजिक असुरक्षिततेची भावना, सुसंवादाचा अभाव, दुसऱ्याबद्दल संकुचित वृत्ती व स्पर्धात्मक भावना ठेवणे. 3) आर्थिक कारणे- दारिद्र्य, लुटारु वृत्ती व पैशाची हाव, अमली पदार्थाची तस्करी, आर्थिक विषमता तसेच विकासातील विषमता, काळा पैसा आदी. 4) राजकीय कारणे- सत्ताकांक्षा, शासनाची उदासीन प्रवृत्ती व फुटीरवादी चळवळीस प्रोत्साहन, सरकारकडून अपेक्षाभंग, राजकीय बजबजपुरी इत्यादी. 5) तांत्रिक कारणे- अत्याधुनिक शस्त्रे व साधने यांची सहज उपलब्धता, आधुनिक दळणवळण सुविधा व प्रगत संदेशवहन सहज शक्य होणे आदी. 6) इतर कारणे- लोकशाही व्यवस्थेचा अभाव, असहिष्णुता, धार्मिक व वंशिक विद्वेष इत्यादी सांगता येतील.

या व अशा उपद्व्यापामुळे मानवास भोगावे लागणारे दुष्परिणाम असे- दहशतवादामुळे सामाजिक तसेच राष्ट्राच्या सुरक्षिततेची भावना धोक्यात येते. संरक्षणावरील खर्च वाढून राष्ट्राच्या विकासाची गती मंद होते. दहशतवादी कारवायांमुळे राष्ट्राच्या संपत्तीचे अतोनात नुकसान होते. राष्ट्राच्या विकासाकडे दुर्लक्ष होते. दहशतवादाची शिकार झालेल्या बांधवांची कुटुंबेच्या कुटुंबे उद्ध्वस्त होतात. अनेक लोकांना प्राण गमवावे लागतात. एकूणच राष्ट्राची व शेवटी जागतिक सुरक्षितता व शांतता भंग पावते. आजच्या स्थितीला संपूर्ण जगात ज्या-ज्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे, त्यापैकी सर्वात मोठी व अवघड समस्या म्हणजे दहशतवाद व हिंसाचार आहे. या दहशतवादामुळेच संपूर्ण जगाची शांतता भंग पावली आहे. फार मोठ्या प्रमाणावर सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या समस्येने देशाची फार मोठी आर्थिक हानी केलेली आहे. दहशतवाद व हिंसाचार याचे मूळ हे धार्मिक महत्त्वाकांक्षेत आहे. आपला धर्म हा सर्वात श्रेष्ठ आहे. त्या धर्माचा प्रचार व प्रसार व्हावा, हा यामागील सर्वात मोठा हेतू आहे. त्यासाठी अत्यंत विषारी आणि विखारी प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो, म्हणून दहशतवाद निर्माण करणारी देशभर पसरलेली केंद्रे संपवणे व धर्मांधतेला प्रोत्साहन देणार्या संस्था, संघटनांची दुकाने बंद करणे आवश्यक आहे. झटपट श्रीमंती, वजनदारपणा, अधिकार व सत्ता हस्तगत लोलुपता याही गोष्टींना हाणून पाडणे आवश्यक राहील. यासाठी जनतेने जागरूक राहून वागले पाहिजे.

!! जागतिक दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन सप्ताहनिमित्ताने सर्वांना दक्षतावर्धक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन -**
**श्री एन. के. कुमार,**
**से.नि.अध्यापक.**
**गडचिरोली, मोबा-**
**7775041086.**

# IAS अधिकारी तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली : आता मंत्री नरहरी झिरवाळांच्या खात्याची जबाबदारी



राज्य सरकारने आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाकाच लावला आहे. मंगळवारी (ता.19 मे) सायंकाळी सरकारने पुन्हा काही वरिष्ठ IAS अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. यात धडाडीचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांची पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. तुकाराम मुंढे हे 2005 च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. तेव्हापासून आत्तापर्यंतच्या त्यांच्या 21 वर्षांच्या कारकिर्दीत त्यांच्या 25 वेळा बदल्या झाल्या आहेत.

फडणवीस सरकारकडून आयएएस अधिकारी तुकाराम मुंढेंची नियुक्ती आता अन्न व औषध प्रशासन विभागाच्या आयुक्तपदी करण्यात आली आहे. मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या खात्याशी संबधित ही बदली असणार आहे. त्यामुळे मुंढे हे झिरवाळांशी कसं जुळवून घेणार हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.राज्य सरकारने तुकाराम मुंढेंची 31 मार्च रोजी दिव्यांग विभागातून आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली केली होती. पण आईचं निधन झाल्यानं ते पदाचा चार्ज घेऊ शकले नव्हते. त्यानंतर सनदी अधिकारी विनिता वैद सिंघल यांची याच पदावरची बदली केली. अवघ्या 10 दिवसांत बदली रद्द केल्यामुळे मुंढेंची पुन्हा एकदा बदली होणार हे स्पष्ट होते.सिंघल यांची पाच महिन्यांपूर्वीच आपत्ती व्यवस्थापनात बदली करण्यात आली होती. पण लगेचच बदली केल्याने वेगवेगळ्या चर्चा सुरु होत्या. त्याच दरम्यान, मंत्री पातळीवर वेगवान घडामोडी घडल्या आणि सिंघल यांची बदली रद्द झाली. त्यांच्याकडे जुनाच कार्यभार कायम ठेवण्यात आला. त्यांना पुन्हा त्याच विभागात कायम ठेवल्याने तुकाराम मुंढे नव्या नियुक्तीच्या प्रतीक्षेत होते.

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती किर्तनसेवेत संपन्न !

## केवड येथील गावकऱ्यांचा स्तुत्य उपक्रम!





केज प्रतिनिधी /रोहन गलांडे केज तालुक्यातील केवड येथील गावकऱ्यांनी अतिशय सुंदर पद्धतीने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी केली आहे ते म्हणजे हिंदवी स्वराज्याचे धाकलधनी स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त काल गावकऱ्यांनी संध्याकाळी 7 ते 9 किर्तनसेवा सुप्रसिद्ध किर्तनकार व शिवचरित्रकार ह.भ.प. सुशेन महाराज नाईकवाडे यांचे किर्तन आयोजित करुन जयंती साजरी केली आहे अशी जयंती साजरी होणे काळाची गरज आहे त्यामुळे गावातील नागरिकांचे कौतुक कराल तेवढे कमीच आहे कारण आजकाल जयंती म्हटल की डीजे,तोफा,आणी आगळ्या वेगळ्या गाण्यावर डान्स करणे अशी जयंती साजरी नाही केली तरी चालती परंतु केवड येथील गावकऱ्यांनी जयंती समाजप्रबोधन करत जयंती साजरी करा असा संदेश देत धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी केली यावेळी गावातील व परिसरातील सर्व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

जपण्याचे काम मोदी करत आहेत ही गोष्ट आपल्याला विसरुन चालणार नाही. देशाची प्रतिष्ठा जिथे येते तिथे राजकीय मतभेद काढायचे नसतात.' दरम्यान, याआधीही शरद पवार यांनी नरेंद्र मोदींच्या कामाचे कौतुक केले होते.

--------------------------------

स्वतः पाच पाच देशाच्या दौऱ्यावर पळून जाण्याच्या प्रधानमंत्र्यांच्या कृतीचा विरोध केला आहे.तसेच विदेशी महिला पत्रकाराच्या प्रश्नाचे उत्तर न देता मान खाली घालून देशाची गरिमा धुळीस मिळवण्याच्या कृत्याचा विरोध केल्याने फडणवीसांना मिरच्या झोंबल्या आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्याबद्दल अपशब्द वापरण्याऐवजी पंतप्रधानांना देशाच्या मूलभूत प्रश्नांपासून पळून न जाता हिंमतीने उपाययोजना करण्याचा सल्ला द्यावा व विदेशात महिला पंतप्रधानांना मेलोडी चॉकलेट गिफ्ट देऊन खी खी ख्या ख्या करत पोरखेळ चाळे बंद करण्याचे उपदेश द्यावेत, असंही पटोले यांनी म्हटलं आहे.नीट पेपरफुटीमध्ये सीबीआयने अटक केलेले दहा पैकी सहा आरोपी हे महाराष्ट्रातील आहेत. पेपर सेट करणारेच पेपर फोडत आहेत, राज्याचे गृहखाते काय करत आहे? राज्याच्या गृहमंत्र्यांनी राज्यातील गुन्हेगारी कमी करण्यावर लक्ष द्यावे. खासदार राहुल गांधी यांच्यावर असांस्कृतीक भाषेत टीका करण्याएवढी आपली उंची नाही हे लक्षात ठेवावे. बाकी जनता कोणाला फेकू, खोटेंद्र आणि अनाजीपंत म्हणते हे आम्हाला चांगल्या प्रकारे माहिती आहे पण असं बोलणं ही काँग्रेसची संस्कृती नाही" असंही नाना पटोले यांनी म्हटलं आहे.

-----------------------------------------

मुक्तीचाही संदेश दिला आहे.

-----------------------------------

यासोबतच या परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य पुतळाही उभारला जाणार आहेनागपुरात तीन दिवसीय 'विश्वशांती परिषद -2026' पार पडली. या परिषदेत श्रीलंका, नेपाल, थायलंड, लाओस, दक्षिण कोरिया आदीं देशातील भिक्खू संघ व प्रतिनिधी सहभागी झाले होते. दरम्यान भारत आणि श्रीलंका यांच्यात सांस्कृतिक करार करण्यात आला. या करारानुसार डॉ. आंबेडकर भवन उभारण्यात येईल असा करार संघकाय फाउंडेशनचे अध्यक्ष भदंत प्रशीलरत्न गौतम आणि श्रीलंकेतील माथा फाउंडेशनचे संस्थापक वें. अथुरलिये रतना थेरो यांच्या दरम्यान स्वाक्षरीने झाला. या कराराचा मुख्य उद्देश आंतरराष्ट्रीय बौद्ध सहकार्य अधिक दृढ करणे, भगवान बुद्धांच्या शिकवणीचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासोबतच शांतता, बंधुता आणि मानवतावादी मूल्यांना प्रोत्साहन देणे हा आहे. करारप्रसंगी कोरियासह विविध देशातील आंतरराष्ट्रीय बौद्ध प्रतिनिधी, बौद्ध भिक्षू, विद्वान, संशोधक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते..या सामंजस्य कराराअंतर्गत बौद्ध धम्म आणि मूल्यांचा प्रचार-प्रसार, जागतिक शांतता व आंतरधर्मीय सलोखा वृद्धिंगत करणे, शैक्षणिक व सामाजिक कल्याणकारी प्रकल्प राबविणे, भारत-श्रीलंका सांस्कृतिक देवाणघेवाण वाढविणे, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन केंद्र तयार करण्यात येणार आहे. याशिवाय भविष्यात बौद्ध परिषदांचे आयोजन, ध्यान शिबिरे आणि विविध मानवतावादी उपक्रम संयुक्तपणे राबविण्याचाही निर्णय या कराराद्वारे घेण्यात आला."भारत आणि श्रीलंका या दोन्ही देशांतील सांस्कृतिक, शैक्षणिक आणि सामाजिक संबंध अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. बाबासाहेबांचा पुतळाहा श्रीलंकेसाठी प्रेरणादायी ठरेल."

----------------------------------

पाहणीत या बांधकामात अनेक गंभीर त्रुटी आढळल्या आहेत. कुलकर्णीच्या अटकेनंतर बेकायदेशीर बांधकामाची चर्चा होत होती. याची दखल घेत नगर मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी तत्काळ तपासणीचे आदेश दिले. त्यानुसार नगर रचनाकार बळीराम मोहिते व वसुली विभाग प्रमुख व्ही. टी. तिडके यांच्या पथकाने मंगळवारी सायंकाळी बांधकामाची स्थळ पाहणी केली. पालिका कुलकर्णीला नोटीस बजावून कारवाई करणार आहे.

-----------------------------------

. अतिशय गंभीर प्रकरणातही गांभीर्य घेतले जात नसेल तर ते दुर्दैवी असुन न्यायासाठीही आमची हेळसांडच होत आहे असा आरोप मुंडे कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी दीप्ती मुंडे व त्यांचे पती वैजनाथ मुंडे यांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांच्याकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. तक्रारीची गंभीर दखल घेत प्रशासनाने तातडीने चौकशी समिती नेमली असून, समितीने गित्ते हॉस्पिटलला भेट देत संबंधित कागदपत्रे व उपचार प्रक्रियेची माहिती घेतली आहे. मात्र, चौकशी होऊन आठ ते दहा दिवस उलटूनही अद्याप अहवाल पीडित कुटुंबाला देण्यात आलेला नसल्याने कुटुंबीयांनी नाराजी व्यक्त केली आहे. प्रकरण गंभीर असताना अहवाल देण्यास विलंब का होत आहे? असा सवालही मुंडे कुटुंबीयांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

या संपूर्ण प्रकरणाचा चौकशी अहवाल तात्काळ जाहीर करावा आणि दोषी असणाऱ्या संबंधित डॉक्टरांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी वैजनाथ मुंडे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

------------------------------------

बालरोग तज्ज्ञ डॉ. गुरुप्रसाद देशपांडे, डॉ. अंकुश जबदे, आयुर्वेद तज्ञ डॉ. रविंद्र ईटके, व स्त्रीरोग तज्ञ डॉ. सौ. मृदुला जबदे या मान्यवर डॉक्टरांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले.

या शिबिरामध्ये पोटदुखी, डोकेदुखी, खोकला, दमा, पाळीच्या तक्रारी या आजारावर उपचार करण्यात आले. तसेच उंची वाढवण्यासाठी योग्य मार्गदर्शन करण्यात आले.

आरोग्य तपासणी यशस्वी होण्यासाठी शिबीर मार्गदर्शक दत्तापा ईटके गुरुजी, अध्यक्ष वैजनाथ ईटके, यावेळी शिबिर प्रमुख श्री सुभाष नाणेकर, सुरेश टाक ले अमर देशमुख सर विलास आरगडेसर प्राचार्य अतुल दुबे उमेश चौंडे बाळासाहेब हंगरगे विजय मुंडे सर शिवशंकर कराड एडवोकेट सायन्स मुंडे महादेव फड अमित कचरे महात्मा हत्ती महात्मा हत्ते अतुल नरवाडकर दत्ताराव नागापुरे ज्ञानोबा मुंडे हरिभाऊ बनसोडे चंद्रकांत चाटे सोमेंद्र शास्त्री विक्रम स्वामी अजय राऊत राहुल तिडके अनिकेत तीळकरी नंदकिशोर पुजारी जगन्नाथ रामदासी यश गायकवाड कार्तिक भारती प्रशांत साखरे विश्वजीत मुंडे रणवीर गायकवाड कृष्णा बागवाले कार्तिक गायकवाड धनराज पवार अवधूत अयचित शिवम गरजे किशोर पवार कपिल चौधरी सौ वीरश्री आर्या एडवोकेट सानिया फड सो गौरी ईटके अस्मिता कावरे आरती धुमाळ प्रणिता चाटे स्वाती वाघमारे संस्कृती संगई संध्या नाईकवाडे गौरी नागराळे सुनिता सावजी भार्गवी पाठक संस्कृती मुंडे प्रतीक्षा डुबे परिघा तिवारी प्रतीक्षा कस्तुरे आदी उपस्थित होते तसेच शिबिरातील अनुभवी क्रीडा शिक्षक तसेच सर्व प्रशिक्षक सह प्रशिक्षक व शिक्षिका सहप्रशिक्षिका या सर्वांनी परिश्रम घेतले. तसेच

शिबिरात विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

-------------------------------------------

लेलँड कंपनीचा टेम्पो यामधून चौसाळा येथून गोवंशीय प्राणी भरुन नांदुरघाट मार्गे केजकडे अवैधरित्या वाहतूक केली जात आहे.

माहिती मिळताच सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सानप यांनी ही माहिती पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांना दिली. त्यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाबासाहेब सानप, पोलिस हेडकॉन्स्टेबल राजू वंजारे, पोलिस कॉन्स्टेबल शेख रशीद व शेख पाशा यांनी नांदुरघाट येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सापळा रचला.

संशयित टेम्पो येताना दिसताच पोलिसांनी इशारा करून वाहन थांबविले. चालकाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव इस्माईल सलीम शेख (वय 28, रा. अजिजपुरा, केज) असे सांगितले. त्याच्याकडे जनावरांच्या वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे निष्पन्न झाले. तसेच सदर गोवंशीय प्राणी हे रियाज इकबाल खुरेशी (रा. रोजा मोहल्ला, केज) यांच्या मालकीचे असल्याची माहिती त्याने दिली.

पंचासमक्ष टेम्पोची झडती घेतली असता त्यामध्ये दोन गीर, तीन खिल्लार, एक देशी गावरान व एक जर्सी अशा एकूण सात गोवंशीय गोऱ्ह्यांची अमानुष पद्धतीने वाहतूक होत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी गोवंशीय प्राणी व वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला टेम्पो असा एकूण 5 लाख 29 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

--------------------------------------

19 -संबोधी बाबासाहेब गायकवाड -252
20 -तेजल जीवन कोकाटे -254
21 -श्रेयस बाळू जाधव -250
22 -श्रेयस योगेश पांडकर -250
23 -स्वानंदी अर्जुन पांचाळ -250
24 -मैथिली महादेव कुचेकर -248
25 -सार्थक बापू गित्ते -246
26 -जान्हवी जीवनराव गवळी -244
27 -मानसी मोतीराम सुरणर -242
28-नंदिनी भाऊसाहेब निकाळजे- 234
29-श्रेयस नरहरी नाईकवाडे -232
30 -दिव्या सूर्यकांत शेप -228
31- नक्ष कृष्णा गरड- 228
32 -प्राची मुंजाभाऊ सावंत -228
33-देवर्ष शिवकुमार कारंजे -222
34-पार्थ विजय धुमाळ- 224
35 -प्रगती बाळासाहेब भोसले- 224
36 -सृष्टी अशोक जोगदंड -222
37 -विश्वराज व्यंकट घुगे -222
38-यशवंत भागवत चव्हाण -200
39 -शगुन आशिष नानवटे -196
40 -नागेश रवी स्वामी -190
41- राजवीर अरविंद सरकाळे -190
42- ऋषिकेश रमाकांत फड -180
43-शुभ्रा अतिश काटकर -182
44 -गायत्री विजयकुमार बकरे -174
45-शरयू संदीप चौंडे -176
46 -प्रणव पंडित पांचाळ -168
47 -गणेश पंकज मुळी -158
48-आर्यन नागनाथ गित्ते -152
49-ओंकार शशिकांत वाघमारे -150
50-यशश्री शिवलिंग पंचाक्षरी -150
51-प्रांजल अनिल जठार -148
52 -रागिणी बाळासाहेब कराड -144
53- त्र्यंबक राधाकृष्ण ओपळे -146
54-राधिका राघवेंद्र कटकमवार -142

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या अथक परिश्रमातून हे दैदिप्यमान यश मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या निमित्ताने संस्कार प्राथमिक शाळेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन. पद्मावती शिक्षण संस्थेचे सचिव श्री दिपकजी तांदळे यांनी आपल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. ते म्हणाले की,संस्कार प्राथमिक शाळा ही केवळ विद्यार्थ्यांना परीक्षार्थी बनवित नाही, तर त्यांना जीवनोपयोगी योग्य शिक्षण देऊन सुसंस्कारित करते. संस्कार शाळा ही विद्यार्थ्यांना सुसंस्कृत व स्वावलंबी बनवण्याचे पवित्र कार्य करते; म्हणूनच तर आमच्या शाळेतील विद्यार्थी दरवर्षी राज्य व जिल्हा गुणवत्ता यादीत आपले नाव सुवर्णअक्षरांनी चमकवतात त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांना मार्गदर्शक करणाऱ्या शिक्षकांचा सिंहाचा वाटा आहे यामध्ये पद्मावती विभाग:श्रीमती रणखांब मॅडम, श्रीमती गित्ते मॅडम , श्रीमती पायघन मॅडम आणि श्रीमती चौंडे मॅडम व विद्यानगर विभाग:श्री सूर्यवंशी सर, श्री फाजगे सर, श्री गोडबोले सर, श्रीमती चाटे मॅडम आणि श्रीमती फड मॅडम.

या सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच हे यश साध्य झाले आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. श्री पद्मावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री कैलास तांदळे, सचिव श्री दीपक तांदळे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनकाडे सर, संस्कार प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका सौ माधुरी ताई तांदळे मॅडम ,प्र. मुख्याध्यापक श्री गायकवाड सर आणि पर्यवेक्षक श्री इंगळे सर, दैठणेकर सर आदी मान्यवरांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे मनापासून अभिनंदन करून भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

-------------------------------------

कान झाकून बाहेर पडणे अशा मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आज विदर्भातील अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये तीव्र उष्णतेची लाट येण्याची दाट शक्यता असल्याने येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. मराठवाड्यातील हिंगोली, नांदेड आणि विदर्भातील यवतमाळ, नागपूर या जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. एकीकडे विदर्भ मराठवाडा होरपळत असताना, दुसरीकडे दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर या जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून येथेही सतर्कतेचा 'येलो अलर्ट' देण्यात आला.

-------------------------------------

आहे", अशी टीका राहुल गांधी यांनी केली आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात राहुल गांधी यांनी केलेले वक्तव्य अत्यंत लज्जास्पद आणि दुर्दैवी आहे. त्यातून त्यांची गोंधळलेली मानसिकता दिसून येते. राजकारणात वैचारिक मतभेद असणे स्वाभाविक आहे, परंतु लोकशाहीतील घटनात्मक पदांवर असलेल्या नेत्यांनी अशी भाषा आणि शब्द वापरणे अत्यंत निंदनीय आहे. हा देशवासीयांच्या भावनांचा अपमान आहे. देशातील जनतेने काँग्रेस पक्षाच्या या द्वेषपूर्ण राजकारणाला सडेतोड उत्तर दिले आहे आणि यापुढेही देत राहील, अशा शब्दात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरुन टीका केली आहे.

## पान 4 वरुन

राष्ट्रीय मजदूर काँग्रेस (इंटक) जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, शेतकरी नेते भाई मोहन गुंड, बापूसाहेब साळुंखे, आप जिल्हाध्यक्ष अशोक येडे, शहराध्यक्ष सय्यद सादिक, सामाजिक कार्यकर्त्या किस्किंदा पांचाळ, रासप जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मातकर, रफिक पठाण, परविन अनेराव, माऊली शिंदे, हनुमान कुटे, हरिश्चंद्र पवार, सीताताई दहे, सीताताई भोसले यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि ग्रामस्थ सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांच्या योजनांमधील कथित गैरव्यवहारांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी आणि पात्र लाभार्थ्यांना तातडीने योजनांचा लाभ द्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. अन्यथा आगामी काळात आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला."योजना आहेत; निधी आहे; पण लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे पोहोचत नाहीत. लाभ मिळवण्यासाठी सामान्य शेतकऱ्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत," असा आरोप आंदोलकांनी केला.

----------------------------------

विभागाच्या भरारी पथकांनी वेळोवेळी कृषी केंद्रांना भेट देऊन तपासणी करावी, तसेच टोल फ्री क्रमांकावर प्राप्त तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. बोगस बियाणांची विक्री रोखण्यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी या बैठकीत दिल्या. कृषी केंद्र दुकानदारांनी बियाणे खरेदीसाठी शेतकऱ्यांवर कोणतीही अट लादू नये, अन्यथा संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला. यावेळी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी बीड जिल्ह्यात गायरान जमिनीसह इतर ठिकाणी चारा लागवडीचे क्षेत्र वाढविण्यावर भर देण्यास सांगितले. तसेच पोकरा योजनेअंतर्गत रेशीम उत्पादनासाठी क्षेत्रवाढ करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. पीक कर्ज वितरणाबाबतही त्यांनी बँक अधिकाऱ्यांना सूचना देत जिल्ह्यात 100 टक्के पीक कर्ज उद्दिष्ट पूर्ण करण्यावर भर दिला. कर्ज वितरणात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित केली जाईल, असे ही त्यांनी सांगितले.

सुरुवातीस प्रास्ताविकात आत्माचे प्रकल्प संचालक तथा प्र. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी खरीप हंगाम जून 2026 पासून सुरु होत असल्याची माहिती दिली. यात बीड जिल्ह्यात 10.68 लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्र असून सरासरी 8.85 लाख हेक्टर क्षेत्रावर खरीप लागवड केली जाते. असे सांगून त्यांनी बि-बियाणांसह खत साठ्याची माहिती, पिक विमा, पिक कर्ज, मृदा तपासणी, शेतकरी अनुदान वाटप याची संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. तसेच बदलत्या हवामानाशी सुसंगत शेतीसाठी पोकरा योजनेतून शेतकऱ्यांना सक्षम करण्याचे प्रयत्न सुरु असून उत्पादनवाढीसाठी विविध नाविन्यपूर्ण प्रयोग राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

-----------------------------------

गेल्या तीन दिवसांपासून त्याला कारागृहातच सलाइन लावून उपचार दिले जात आहेत.

वाल्मीक कराडचा त्रास पाहता त्याला पुढील उपचारांची गरज आहे. मात्र, बीड जिल्हा रुग्णालयात सध्या 'युरोलॉजिस्ट' (मूत्रविकार तज्ज्ञ) उपलब्ध नसल्याने त्याला अंबाजोगाईला पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बुधवार किंवा गुरुवारपर्यंत जर त्याचा हा त्रास कमी झाला नाही, तर त्याला तातडीने कडक पोलिस बंदोबस्तात अंबाजोगाई येथील 'स्वाराती' रुग्णालयात हलवले जाईल, अशी माहिती सुत्रांनी दिली आहे. युरोसिसटायटीस' म्हणजे मूत्राशयाला होणारा तीव्र जिवाणू संसर्ग किंवा सूज होय. यामध्ये रुग्णाला लघवी करताना तीव्र वेदना होणे, आग होणे, पोटात खालच्या भागात असह्य कळा येणे, वारंवार लघवीला जावे लागणे आणि काही वेळा लघवीतून रक्त पडणे अशी लक्षणे दिसतात. वेळेवर उपचार न मिळाल्यास हा संसर्ग किडनीपर्यंत पसरु शकतो.

या आजाराचे निदान करण्यासाठी सर्वप्रथम लघवीची चाचणी केली जाते. संसर्ग कमी करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली उच्च क्षमतेची अँटिबायोटिक्स औषधे किंवा सलाइनद्वारे इंजेक्शन्स दिली जातात. तसेच शरीरातील पाण्याचे प्रमाण संतुलित ठेवण्यासाठी रुग्णाला जास्तीत जास्त द्रवपदार्थ घेण्याचा सल्ला दिला जातो.

----------------------------------

की,सध्याच्या परिस्थितीत शेती उत्पादन खर्चात मोठी वाढ होत असून शेतकऱ्यांनी गोआधारित व नैसर्गिक शेतीकडे वळणे काळाची गरज आहे.जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी माती परीक्षण करुन त्या आधारे संतुलित खत व्यवस्थापन करावे. रासायनिक खतांचा अतिरेकी वापर टाळून शेणखत,हिरवळीची खते,पिकांचे अवशेष, काडी-कचरा व इतर सेंद्रिय खतांचा वापर वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले.ते पुढे म्हणाले की,मराठवाडा भागातील जमिनींमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण अत्यंत कमी होत चालले असून ते वाढविण्यासाठी सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने खाद्य व्यवस्थापन करणे तसेच नियमित दर तीन महिन्यांनी जंतनिर्मूलन करणे गरजेचे आहे. पशुधनाला वेळापत्रका नुसार लसीकरण केल्यास विविध संसर्गजन्य रोगांपासून संरक्षण मिळते,असेही त्यांनी स्पष्ट केले. शिबिराचे उद्घाटन गावचे सरपंच श्री.बंडू मारुती शिंदे यांच्या हस्ते देशी गोवंश पूजन करून करण्यात आले.शिबिरा दरम्यान पशुधनांना जंतनिर्मूलनाच्या मात्रा देण्यात आल्या. एकूण 166 पशुधनांवर जंत निर्मूलन उपचार करण्यात आले.या शिबिरात 48 शेतकऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील प्रगतशील शेतकरी श्री.मारुती शिंदे व श्री.काकासाहेब अडसूळ यांनी विशेष सहकार्य केले.

-------------------------------------

केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, विनायक नगर भागातील मुख्य रस्त्यावरील आरोही मेडिकल समोर संजय मुळे यांच्या मातोश्री या बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे घरासमोर बसलेल्या होत्या. दरम्यान, एका दुचाकीवरुन दोन अज्ञात तरुण तिथे आले. त्यांनी काहीतरी विचारपूस करण्याचा आणि पत्ता विचारण्याचा बहाणा केला. वृद्ध महिला काही समजण्याच्या आतच, दुचाकीवर मागे बसलेल्या चोराने महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावण्याचा प्रयत्न केला. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे वृद्ध महिला बिथरली नाही, तर त्यांनी चोराशी प्रतिकार केला. या झटापटीत चोराच्या हाताला सोन्याच्या गंठणाचा काही भाग लागला, तर मंगळसूत्रातील काही सोन्याचे मणी महिलेच्या हातात राहिले. अचानक झालेल्या या गोंधळामुळे आणि परिसरातील नागरिकांची चाहूल लागताच चोरट्यांनी दुचाकीवरुन भरधाव वेगाने पळ काढला. या झटापटीत वृद्ध महिलेच्या गळ्याला किरकोळ दुखापत झाली आहे.

------------------------------------

वाढल्याचे मानले जात आहे. त्यामुळे अनेक पेट्रोल पंपांवरील साठा काही तासांतच संपत असल्याचे चित्र आहे.

या टंचाईचा फटका केवळ शेतीपुरता मर्यादित राहिलेला नाही. मालवाहतूक करणाऱ्या वाहनांच्या फेऱ्या विस्कळीत झाल्याने वाहतूक व्यवस्थेवर परिणाम झाला आहे. वेळेवर माल पोहोचत नसल्याने व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. तसेच छोटे उद्योग, जनरेटरवर चालणारे व्यवसाय आणि बांधकाम क्षेत्रालाही याचा मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, पेट्रोल पंपांवर डिझेल मिळवण्यासाठी वाहनधारकांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागत असून, काही ठिकाणी इंधन संपल्याची घोषणा झाल्यानंतर नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. किरकोळ वादावादीच्या घटनाही घडत असल्याचे दिसून येत आहे.

खरीप हंगामाच्या निर्णायक टप्प्यावर निर्माण झालेली ही डिझेल टंचाई तातडीने दूर न झाल्यास शेती उत्पादन, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि वाहतूक व्यवस्था यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी जोर धरत आहे.

------------------------------------

वर्गांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याची माहितीही देण्यात आली.

--------------------------------

परळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी पदभार स्वीकारताना "विकास पर्व 2.0" ची घोषणा करत शहराच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प मांडला होता. त्याच अनुषंगाने धार्मिक भावना, जनभावना आणि परळीच्या पवित्रतेशी संबंधित निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.परळी हे पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र असल्यामुळे सोमवारचा दिवस भाविकांसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने तात्काळ स्पष्ट आदेश, जनजागृती मोहीम, पोस्टर, जाहीर सूचना आणि आवश्यक प्रशासनिक कारवाई करून सर्वानुमते मंजूर झालेल्या ठरावाची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी शहरातील भाविक व नागरिकांकडून केली जात आहे.

श्री वैद्यनाथ प्रभू यांच्या पवित्र नगरीच्या सन्मानासाठी घेतलेला निर्णय केवळ कागदापुरता न राहता प्रत्यक्षात काटेकोरपणे राबविण्यात यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

------------------------------------

ते सारुकवाडी डोका, हदगाव, लाखा रस्ता हे काम मस्के यश कंट्रन्शन यांना निर्गमित करण्यात आले आहे.तरी यश कंट्रन्शन हे काम वेळेत पूर्ण करणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.तरी यश कंट्रन्शन हे काम येणाऱ्या पावसाळ्याच्या आधी पुर्ण करण्यात यावे अशी मागणी नागरिकांन कडून केली जात आहे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरु झाले आहे.

-----------------------------------

काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

गेवराई तालुक्यातील गोदावरी नदी काठच्या गावातील टंचाई परिस्थिती लक्षात घेता माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी या पाठपुरावा केला आहे. गेवराई तालुक्यातील आगरनांदूर, हिंगणगाव, खामगाव, राक्षसभुवन, सावळेश्वर, संगम जळगाव, नागझरी यासह आदी ग्रामपंचायतीने ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी आणि गुरांना पाणी मिळावे यासाठी जायकवाडी जलाशयाच्या उजव्या कालव्यातून गोदावरी नदी पात्रात पाणी सोडण्याची विनंती ठरावा द्वारे केली होती. गटविकास अधिकारी यांच्यासह पाणीपुरवठा विभागाच्या अहवालानंतर जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, त्यानुसार या भागातील लोकसंख्या आणि एकूण पशुधनांची संख्या लक्षात घेऊन त्यांना लागणाऱ्या पाण्याचे मोजमाप करून पाणी सोडणे बाबतचा निर्णय घेण्यात आला. दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची प्रत्यक्ष भेट घेऊन टंचाईग्रस्त ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी नदीपात्रात पाणी सोडण्याची मागणी केली.

-------------------------------------

आंबेजोगाई येथील बेटीचे स्वागत केले.कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना ने करण्यात आली

व्यासपीठ प्रमुख हैदराबाद निवासी अनुराधा जाजू यांचा सत्कार पूनम मुंदडा यांनी केला.

या प्रसंगी सौ माधुरी चितलांगे, बीड जिल्हा सहसचिव, आपल्या भाषणात म्हणालया की बेटीयाला जावई सोबत बोलावून सन्मान केला. एड.श्रीकृष्ण तोष्णीवाल बेटीच्या सन्मानात परिवाराचा सन्मान वाढणारी आमची बहन बेटी मान ठेवणार. तसेच निराधार महिलांना व्यवसायात प्राधान्य देणार असे मत व्यक्त केले.जीन हातो मे चलना सिखाया,, ऊन हातो को भुला नही चाहिये ही नाटिका माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने प्रस्तुत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सो ज्योती राठी यांनी केले

---------------------------------

रेणापूरकर यांनी आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतीमधील बियाणे,खते व औषधे यांसारख्या कृषी निविष्ठांचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली.उत्पादन खर्च कमी करण्यासाठी ट्रॅक्टरचा सुयोग्य वापर,सुधारित बैलचलित अवजारांचा वापर तसेच कार्यक्षम ऊर्जा वापर याविषयी जनजागृती करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले की,खरीप हंगामामध्ये बियाणे,खते व तण नाशकां मध्ये बचत करून शाश्वत उत्पादन वाढीसाठी रुंद वरंबा-सरी टोकण यंत्राचा वापर, बैलचलित सौर आधारित फवारणी यंत्र,ट्रॅक्टर चलित फवारणी यंत्र तसेच ड्रोनद्वारे फवारणी यांसारख्या आधुनिक यांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरणार आहे.

महाबीजचे प्रक्षेत्र अधिकारी सचिन सोनवणे यांनी महाबीज च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या बीजोत्पादन कार्यक्रमाची माहिती देताना शेतकऱ्यांना बीजोत्पादनाद्वारे शेतीतील उत्पन्न वाढविण्याचे आवाहन केले.प्रत्येक गावामध्ये किमान 25 एकर किंवा त्यापेक्षा जास्त क्षेत्रावर बीजोत्पादन कार्यक्रम राबविण्यासाठी महाबीज कडून सहकार्य करण्यात येत असून त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. प्रदीप सांगळे यांनी जैविक खते व जैविक औषधांच्या वापराविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आगामी खरीप हंगामा साठी बीजप्रक्रियेस उपयुक्त विविध निविष्ठा कृषि विज्ञान केंद्रावर उपलब्ध असून शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा,असे आवाहन त्यांनी केले.सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती डांगे यांनी महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी यायोजनांचा लाभ घ्यावा,असे सांगितले.कार्यक्रमास गावातील युवक, प्रगतीशील शेतकरी व महिला शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---------------------------------





हॅलो बीड

परळी संघर्षनेता

गुरुवार दि. 21 मे 2026



# संतप्त शेतकऱ्यांनी बीड पंचायत समितीला ठोकले टाळे

## ➡ शेतकऱ्यांच्या योजनांचा बोजवारा; योजनांतील गैरव्यवहारांचे गंभीर आरोप



बीड : शेतकऱ्यांसाठी शासनाच्या विविध कल्याणकारी योजना असतानाही त्यांचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नसल्याच्या आरोपावरून संतप्त शेतकऱ्यांनी आज बीड पंचायत समिती कार्यालयाला टाळे ठोकत जोरदार आंदोलन केले. शिवराय-फुले-शाहू-आंबेडकर विचारांची आघाडीचे समन्वयक भीमराव कुटे पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी पंचायत समिती प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी करत शेतकऱ्यांच्या हिताच्या योजना प्रभावीपणे राबविण्यात गटविकास अधिकारी (बीडीओ) आणि संबंधित विभाग पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप केला. शासनाच्या माध्यमातून सिंचन विहिरी, गायगोटे, वृक्षलागवड, घरकुल योजना, पाणंद रस्ते यांसारख्या अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना पंचायत समिती मार्फत राबविल्या जातात. मात्र बीड तालुक्यातील अनेक पात्र शेतकरी या योजनांपासून वंचित असल्याची खंत आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

शेतकऱ्यांच्या वैयक्तिक लाभाच्या योजनांचे पैसे संबंधितांच्या खात्यावर जमा करण्यासाठी लाच मागितली जात असल्याचा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी पंचायत समिती कार्यालयाला टाळे ठोकून प्रशासनाविरोधात रोष व्यक्त केला.

अचानक झालेल्या या आंदोलनामुळे पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. आंदोलनकर्त्यांच्या संतापामुळे काही काळ कार्यालयीन कामकाजावरही परिणाम झाल्याचे दिसून आले.

या आंदोलनात शिवशक्ती-भीमशक्तीचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील, सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेश कर, पान 3 वर

# बीड जिल्हा खरीप हंगामपूर्व आढावा बैठक संपन्न

## जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करावी- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन



बीड, दि.20 (जिमाका) :- जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठा मुबलक आणि गुणवत्तापूर्ण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने चोख नियोजन करावे. तसेच जिल्ह्यात कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्यावर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित कृषी विभागाच्या जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, प्र.जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, कृषी उपसंचालक दादाराव जाधव यांच्यासह संबंधित विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन म्हणाले की, कृषी निविष्ठांची कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या तसेच विशिष्ट कंपनीचे उत्पादन घेण्याची शेतकऱ्यांना सक्ती करणाऱ्या दुकानदारांवर कठोर कारवाई करावी. कृषी पान 3 वर

# वाल्मीक कराड कारागृहातच तीन दिवसांपासून 'सलाइनवर'; 'युरोसिसटायटीस' संसर्गाचा अंदाज!




बीड : मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड हा सध्या बीड येथील जिल्हा कारागृहात न्यायबंदी म्हणून आहे. गेल्या तीन दिवसांपासून त्याला लघवीच्या जागी त्रास होत असून, त्याला 'युरोसिसटायटीस' नावाचा गंभीर संसर्ग झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर, त्याला उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ (स्वाराती) ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्याच्या हालचाली प्रशासनाकडून सुरू आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, कारागृहात असलेल्या वाल्मीक कराडला अचानक त्रास सुरू झाल्याने तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी बीड जिल्हा रुग्णालयाशी संपर्क साधला होता. त्यानंतर मंगळवारी जिल्हा रुग्णालयातील विशेष तज्ज्ञ डॉक्टरांच्या एका पथकाने कारागृहात जाऊन कराडची वैद्यकीय तपासणी केली आहे. पान 3 वर

# दीनदयाल शोध संस्थान कृषी विज्ञान केंद्रातर्फे पशुआरोग्य शिबिराचे आयोजन





अंबाजोगाई प्रतिनिधी/रोहन गलांडे दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र, अंबाजोगाई यांच्या वतीने दिनांक 20 मे 2026 रोजी अंबाजोगाई तालुक्यातील सुगाव येथे पशु आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.या शिबिरामध्ये शेतकऱ्यांना गोआधारित शेती,सेंद्रिय शेती तसेच पशुधन व्यवस्थापना बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सुगाव चे सरपंच श्री.बंडू मारुती शिंदे हे होते.यावेळी सुगाव चे रोजगार सेवक श्री. अतुल अभिमान शिंदे,प्रगतशील शेतकरी श्री.महादेव मारुती शिंदे तसेच कृषी विज्ञान केंद्राचे पशु तज्ञ डॉ.रवींद्र कोरके उपस्थित होते.शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. रवींद्र कोरके यांनी सांगितले पान 3 वर

# भररस्त्यात पत्ता विचारण्याचा बहाणा केला अन्...; दागिने हिसकावताना चोरांशी वृद्ध माउलीची झुंज!



कडा (जि. बीड): आष्टी शहरात चोरट्यांचा वाढता धुमाकूळ नागरिकांच्या आणि पोलिसांच्या चिंतेचा विषय बनला आहे. आता दिवसाढवळ्याही महिलांवर हल्ले करून दागिने लुटण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. आष्टी शहरातील विनायक नगर परिसरात बुधवारी सकाळी घडलेली एक धक्कादायक घटना सध्या संपूर्ण शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील गंठण हिसकावतानाचा प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला असून हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त पान 3 वर

# आष्टीत खरीप हंगामाच्या तोंडावर इंधन टंचाई; पंपांवर रांगा, शेतीची कामे ठप्प



आष्टी : तालुक्यासह ग्रामीण भागात अचानक निर्माण झालेल्या डिझेल टंचाईमुळे शेतकरी, वाहनचालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. खरीप हंगामाच्या पूर्वतयारीच्या काळातच इंधनाचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतीची मशागत, वाहतूक व्यवस्था आणि छोट्या उद्योगांवर गंभीर परिणाम होत असल्याचे चित्र दिसत आहे.

पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून, अनेक ठिकाणी तासन्तास प्रतीक्षा करूनही इंधन मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागात ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, पाणी उपसा पंप यांसारखी शेतीची बहुतांश कामे डिझेलवर अवलंबून असल्याने यंत्रसामग्री ठप्प झाली आहे.

डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांना वेळेत मशागत करणे शक्य होत नसून खरीप पेरणीवर त्याचा थेट परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही भागांमध्ये वाढलेली मागणी, लग्नसराई तसेच मालवाहतूक वाढल्याने इंधनाचा ताण अधिक पान 3 वर

# डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अकॅडमीचा शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार यश

परळी /प्रतिनिधी- परळी येथील डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अकॅडमी च्या विद्यार्थ्यांनी इयत्ता 5 वी व 8 वी शिष्यवृत्ती परीक्षा 2025-26 मध्ये उल्लेखनीय यश संपादन करत संस्थेच्या यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभल्याने हे यश शक्य झाले असून परिसरातून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

इयत्ता 5 वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत अनुष्का मुंडे (53.69%), रोहित शिंदे (52.34%), श्लोक कराड (51.67%), सायली बिडगर (48.99%), गुरुदत्त कराड (48.32%), अलिजाफातेम शेख (47.65%) व रोविता कुंभारे (45.63%) यांनी उत्कृष्ट यश संपादन केले.

तसेच इयत्ता 8 वीच्या परीक्षेत प्रणव मुंडे (54.36%), प्रविण मुंडे (51.00%), श्रुती बेडे (51.00%), तन्वी फड (48.32%) व माया गिते (42.95%) यांनी घवघवीत यश मिळवत अकॅडमीचे नाव उज्ज्वल केले.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे शिक्षकवृंद, व्यवस्थापन समिती व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. "कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन यामुळेच विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले," अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, संस्थेकडून 5 वी ते 10 वी फाउंडेशन पान 3 वर

# परळीत "सोमवारी मांस विक्री बंदी" ठरावाच्या अंमलबजावणीची प्रतीक्षा; नागरिकांकडून तात्काळ कारवाईची मागणी



परळी वैजनाथ : परळी नगरपरिषदेच्या दि. 30/04/2026 रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत "प्रत्येक सोमवारी मांस विक्री बंदी" ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. पंचम ज्योतिर्लिंग श्री वैद्यनाथ प्रभू यांच्या पवित्र नगरीच्या भावना जपत घेतलेल्या या निर्णयाचे त्या वेळी शहरभर स्वागत करण्यात आले होते. विशेषतः अधिकमास प्रारंभ झाल्यामुळे भाविकांमध्ये या निर्णयाबद्दल सकारात्मक भावना व्यक्त होत होत्या.

मात्र मंजुरीनंतर दि. 25/05/2026 रोजी चौथा सोमवार येत असतानाही प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत आवश्यक ती प्रभावी कार्यवाही झालेली दिसून येत नसल्याची चर्चा शहरात सुरु आहे. नागरिकांच्या मते, अद्याप नगर परिषदेमार्फत वृत्तपत्रांमध्ये अधिकृत जाहीर प्रसिद्धी, व्यापाऱ्यांना स्पष्ट नोटीस, लाऊडस्पीकरद्वारे जनजागृती किंवा सातत्यपूर्ण सूचना देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे अनेक भागांमध्ये सोमवारची मांस विक्री सुरु असल्याचे चित्र दिसत आहे.

याबाबत वेळोवेळी नगर परिषद प्रशासन, मुख्याधिकारी, नगराध्यक्षा, गटनेते तसेच नगरसेवक-नगरसेविका यांना अभिनंदन संदेश, निवेदने, WhatsApp संदेश, ईमेल व स्मरणपत्रांद्वारे अंमलबजावणीची मागणी करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्ष पातळीवर अधिक काटेकोर उपाययोजनांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पान 3 वर

# चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम पुर्ण कधी होणार का ?

## • गुत्तेदाराचा हालगर्जीपना पावसाळ्यात नागरिकांना भोवणार ?




केज प्रतिनिधी /रोहन गलांडे केज तालुक्यातील चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम आणखी अपूर्ण आहे व काही दिवसांवर पावसाळा सुरु होत आहे परंतु चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम अपूर्ण आहे जर पावसाळ्या पर्यंत काम पुर्ण झाले नाही तर येणाऱ्या पावसाळ्यात पन चिंचोली माळी,सारुकवाडी येथील नागरिकांना आहे त्यांच मृत्यूचा सापळा बनलेल्या रोडने प्रवास करावा लागतो की काय असा प्रश्न उपस्थित केला आहे तरी मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत रामा 74 चिंचोली माळी पान 3 वर

# आ विजयसिंह पंडित यांच्या पाठपुराव्याला यश – गोदावरी नदीपात्रात पाणी सुटणार



बीड दि. 19 (प्रतिनिधी) : गेवराई तालुक्यातील गोदावरी नदीकाठावरील ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेऊन माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी जायकवाडी प्रकल्पातून गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. आ. पंडित यांच्या मागणी वरून जिल्हाधिकारी, बीड यांनी नदीपात्रात ग्रामस्थांना पिण्याचे पाणी आणि गुरांसाठी पाणी सोडण्यास अखेर मंजुरी दिली आहे. त्यामुळे लवकरच वितरिका क्रमांक चार मधुन गोदावरी नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे. याबाबतची माहिती आ. विजयसिंह पंडित यांनी देऊन पान 3 वर

# अंबाजोगाई महिला मंडळाच्या वतीने बाई, बेटी, जमाई संमेलन संपन्न



अंबाजोगाई प्रतिनिधी आंबेजोगाई आर्यविर मंगल कार्यालयात माहेश्वरी महिला मंडळ यांच्या वतीने अंबाजोगाई शहरातील मुली, जवाई यांना बोलावून भव्य सत्कार आयोजित केला आहे. माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्ष सौ पूनम मुंदडा व सचिव सौ वर्षा रांदड यांनी सकाळी सात वाजल्यापासून पदाधिकार्यासोबत उभ्या राहून पान 3 वर

# बोरीसावरगाव येथे विज्ञान आधारित कृषी निविष्ठा व्यवस्थापन जनजागरण अभियान संपन्न !




केज प्रतिनिधी/ रोहन गलांडे दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथे "विज्ञान आधारित कृषी निविष्ठा व्यवस्थापन विषयक समग्र जन जागरण अभियान" अंतर्गत शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच वैजनाथ देशमुख होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाबीज अंबाजोगाईचे प्रक्षेत्र अधिकारी सचिन सोनवणे,कृषि विज्ञान केंद्राचे पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ.प्रदीप सांगळे, कृषि अभियंता प्रमोद रेणापूरकर तसेच सहाय्यक कृषि अधिकारी श्रीमती डांगे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कृषि अभियंता प्रमोद पान 3 वर

